# लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन व मराठी राजभाषा दिन साजरा



रामन परिणाम (प्रकाशाचे मॉलिक्युलर स्कॅटरींग) हे भारतीय शास्त्रज्ञ डॉक्टर चंद्रशेखर वेंकट रामन यांचे एक संशोधन असून यासाठी त्यांना इ.स १९३० चे भौतिकशास्त्राचे नोबेल पारितोषिक मिळाले होते.
डॉक्टर चंद्रशेखर वेंकट रामन यांचा जन्मदिवस २८ फेब्रुवारी राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो या दिवसाचे औचित्य साधून श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचालित लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्याचबरोबर २८ फेब्रुवारी मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा करण्यात आला मराठी राज्यभाषा दिनाची प्रस्तावना , महाराष्ट्राच्या भाषांच्या विविध आवृत्ती असलेल्या नकाशाचे अनावरण करण्यात आले कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉक्टर सी व्ही रामन व कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय प्राचार्य श्री योगेश गायकवाड सर यांच्या हस्ते करण्यात आले.
त्यांनी आपल्या मनोगतातून मराठी ही राजभाषा व तीच्या संवर्धनासाठी कवी कुसुमाग्रज यांचे मराठी साहित्यातील योगदान पटवून सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लोकमंगल आयटीआयचे वीजतंत्री निदेशक श्री संभाजी जाधव सर यांनी केले. कार्यक्रम स्थळी श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संस्थेचे एच आर माननीय श्री संतोष कुलकर्णी सर, लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य माननीय श्री योगेश गायकवाड सर, निदेशिका संध्याराणी शिंदे मॅडम, प्रदीप विटकर सर, राहुल गवळी सर, सौरभ दहिटणकर सर, रणजीत गाडे सर, रमेश लवटे सर, संभाजी जाधव सर त्याचप्रमाणे लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या १०५ विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.